# मेट्रोची 'जायका'कडून पाहणी

## १३ हजार कोटी रुपये कर्ज दिलेल्या संस्थेकडून प्रकल्पाचा आढावा

**म. टा. खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मेट्रोला १३ हजार कोटी रुपये कर्ज दिलेल्या जपानच्या 'जायका' संस्थेच्या प्रतिनिधींनी अलिकडेच या प्रकल्पाला भेट दिली. आपण दिलेल्या कर्जाच्या माध्यमातून उभ्या राहणाऱ्या मेट्रो-३ची उभारणी नेमकी कशी सुरू आहे, याचा त्यांनी आढावा घेतला.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो-३ मार्ग उभा होत आहे. 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' असे हा मार्ग असेल. या मार्गाचा पहिला टप्पा सिप्झ ते बीकेसी उत्तर असा असेल. तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑप. एजन्सीने (जायका) जवळपास १३ हजार ३८५ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. या कर्जाऊ रकमेचा नेमका कसा उपयोग करण्यात आला आहे, यासंबंधी माहिती घेण्यासाठी 'जायका'च्या प्रतिनिधींनी मेट्रोला भेट दिली.

मेट्रो-३ ची उभारणी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) करीत आहे. 'जायका' चे संचालक तात्सुहिको सुनोंची यांनी सर्वात आधी एमएमआरसीएलच्या कार्यालयाला भेट देऊन प्रकल्पाची विस्तृत स्थिती जाणून घेतली. त्यानंतर एमआयडीसी मेट्रो स्थानकाला भेट देऊन तेथील कामाची पाहणी केली. मेट्रो-३चा, जो पहिला टप्पा सुरू होणार आहे, त्यातील एमआयडीसी हे महत्त्वाचे स्थानक असेल. त्यामुळेच या स्थानकाची उभारणी कशी झाली आहे, याबाबत सुनोंची यांनी आढावा घेतला. त्याखेरीज आरे कारशेड व कारशेडजवळील सारिपूतनगर भागातील भूमिगत मार्गाचीही पाहणी केली.



### कामाबद्दल समाधान

आरे कारशेडसंबंधीच्या अडथळ्यांमुळे या मेट्रोला वर्षभराचा विलंब झाला आहे. या विलंबाच्या पार्श्वभूमीवरच सुनोंची यांनी प्रकल्पाला भेट दिली. परंतु विलंब असला तरी आता हे काम झपाट्याने सुरू असल्याबद्दल सुनोंची यांनी समाधान व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले. मेट्रो- चा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ व दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ पासून सुरू होणार असल्याची माहिती सुनोंची यांना देण्यात आली.